दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी,माटुंगा, मुंबई या संस्थेस प्रलंबित वीज देयके अदा करण्याकरीता एक विशेष बाब म्हणून अनुदान मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र चिएसो-२०१७/प्र.क.१७३/का ८
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक - २४ ऑक्टोबर, २०१७

संदर्भ:-

१.ए.बा.वि.से.यो.आयुक्तालय, नवी मुंबई यांचे पत्र क्र एबाविसेयो/अं.वाडी/२०१७.१८/२५९१ दि.१८.८.२०१७.

२. ए.बा.वि.से.यो.आयुक्तालय, नवी मुंबई यांचे पत्र क्र एबाविसेयो /चिऐसो/२०१७.१८/२७१८ दि.०१.९.२०१७.

३.महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.बालगृ-२०१२/प्र.क्र.२५/का-८ दि.०२.०५.२०१२.

प्रस्तावना :

दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी, मुंबई कडील मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचे सन २००५-०६ पासून विद्युतदेयक प्रलंबित असून मागील तीन वर्षात रू. ७६,०७,११४/- (रू. शहात्तर लाख सात हजार एकशे चौदा फक्त) इतके देयक अदा करण्यात आले आहे. मात्र तरी देखील माहे ऑगस्ट २०१७ अखेर रू. १,६८,२२,८४७/- ची विदयुत देयके प्रलंबित आहेत. दि चिल्ड्रेन्स् एड् सोसायटी ही आशिया खंडातील एक नामांकित संस्था आहे. संस्थेमार्फत हजारो बालकांचे पुनर्वसन करण्यात येऊन त्यांचे जीवनाला योग्य दिशा देण्यात आली आहे. आजमितीस संस्थेमार्फत बालसदन, बालगृह, निरीक्षण गृह, माध्यमिक शाळा, औद्योगिक शाळा असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. संस्थेचे स्वरूप, संस्थेकडून करण्यात येणारे संवेदनशील कार्य आणि वीज देयके अदा न करण्यात आल्यास संस्थेचा वीज पुरवठा खंडित होण्याची शक्यता आहे, या बाबी विचारात घेऊन दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी, मुंबई या संस्थेस प्रलंबित वीज देयके अदा करण्याकरीता एक विशेष बाब म्हणून अनुदान उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी, मुंबई या संस्थेच्या मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. या कंपनीच्या माहे ऑगस्ट २०१७ अखेर प्रलंबित विद्युत देयकातील निवळ देय रक्कम रु. ७१,८९,१४१/- (अक्षरी रुपये एक्काहत्तर लक्ष एकोणनव्वद हजार एकशे एक्के चाळीस फक्त) इतक्या अनुदानास प्रलंबित वीज देयक अदा करण्याबाबत एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

२. याबाबत होणारा खर्च २२३५ - सामाजिक सुरक्षा व कल्याण या अंतर्गत (२२३५ ३०४१), ३१, सहायक अनुदान (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी, मुंबई या संस्थेने यापुढे वीज देयके प्रलंबित राहणार नाहीत याबाबत खबरदारी घ्यावी. पाणी तापविण्यासाठी सोलार वॉटर हिटर बसविण्याबाबतची कार्यवाही करावी. संस्थेने जास्तीत जास्त देणग्या मिळविण्याबाबत तसेच संस्थेच्या स्थावर मालमत्तेवर जास्तीत जास्त निधी उपलब्ध होईल, याद्दष्टीने प्रयत्न करावेत. तसेच शासन निर्णय दि. ०२ मे, २०१२ मधील नमूद अटी/शर्तीची पूर्तता करण्यात यावी.

४. सदर प्रकरण पुर्वोदाहरण म्हणून विचारात घेण्यात येऊ नये.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.**१९५**/ २०१७, व्यय-६, दि. ०७.१०.२०१७ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार वित्त विभागच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय हा शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१७१०२४१५११३३५३३० असा आहे. सदरचा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2dd57c16934e9cb6672cc02aa258b08, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2017.10.24 15:01:16 +05'30'

(स्मिता निवतकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) महालेखापाल १, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),मुंबई
२) महालेखापाल २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),नागपूर
३) अधिदान व लेखा कार्यालय मुंबई शहर.
४) आयुक्त , महिला व बाल विकास आयुक्तालय,म.रा. पुणे.
५) आयुक्त , एकात्मिक बाल विकास योजना, आयुक्तालय,म.रा. नवी मुंबई
६) कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-६)
७) मुख्य अधिकारी, दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी,माहिम,मुंबई
८) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मुंबई शहर/मुंबई उपनगर
९) कक्ष अधिकारी (का-४) , महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन , मुंबई
१०) निवड नस्ती का-८